रविवार, १९ जानेवारी २०२५

तरुण भारत संवाद

# मुलींनी शिक्षणासह स्वसंरक्षण करावे

## पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांचे आवाहन : भद्रकाली ताराराणी पुरस्काराने पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांचा सन्मान


प्रतिनिधी

कोल्हापूर

मेळघाटातील आदिवासी समाजाला शिक्षण मिळालेले नाही. आजही तेथील शाळा शिक्षक विरहीत चालतात. परंतू तेथे महिलांना पूर्ण स्वातंत्र्य असून त्या बिनधास्तपणे जगतात. परंतू सुशिक्षत समाजात आजही मुलींना स्वातंत्र्य नाही, हे दुर्दैव आहे. तसेच मुलींनी शिक्षणाबरोबर कष्ट करून स्वत:चे संरक्षण केले पाहिजे, असे आवाहन पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांनी विद्यार्थीनींना केले.

ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दिला जाणार 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार'' पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांना देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

डॉ. कोल्हे म्हणाल्या, आदिवासी समाजाकडून मी खूप काही शिकले, मुली तेथे स्वत:चे लग्न स्वत: करतात.



कोल्हापूर : खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हंस्ते 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' स्वीकारताना पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे. सोबत अशोक पवर्ते-पाटील, डॉ. एस. एन. पवार, डॉ. रविंद्र कोल्हे, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. प्रकाश हिलगे, सचिव डॉ. प्राजक्त पाटील.

आदिवासी समाजात स्त्रीभ्रूणहत्या होत नाही. स्त्रीप्रधान संस्कृती असल्याने मुलींसाठी तीन मुलांनंतरही प्रतीक्षा करणारी अनेक कुटुंब आहेत. मुलगी जन्माला आल्यानंतर आनंदोत्सव साजरा केला जातो. स्त्री-पुरूष समानता आहे. तेथे महिलांना पूर्णत: स्वातंत्र्य आहे. तेथे कोणीही आत्महत्या करीत नाहीत. आदिवासी समाजातील अंधश्रध्दा, अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांची संस्कृती संवर्धन केली आहे. कष्टामुळेच तेथील महिला समोरच्याशी दोन हात करू शकतात, म्हणून मुलींनी कष्ट करायला शिकले पाहिजे. स्वत:चे जेवण स्वत: तयार केले पाहिजे. कारण महिलाच जगाचे चित्र बदलू शकतात. तुम्हीच खऱ्या ताराराणीच्या वारसदार आहात, म्हणून कष्ट करायला शिका, असा सल्ला त्यांनी विद्यार्थिनींना दिला.

खासदार श्रीमंत शाहू छत्रपती म्हणाले, डॉ. कोल्हे दाम्पत्यांनी आदिवासी लोकांना चांगले जीवन दिले. त्यांना कायदे शिकवत हक्क मिळवून दिले. महिलांना त्यांचे अधिकार माहित आहेत, परंतू आपल्याकडे महिलांना अद्याप हक्क दिले जात नाहीत. डॉ. स्मिता कोल्हे याच खऱ्या ताराराणी आहेत. आदिवासींच्या हक्कासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे. त्यांचे कार्य प्रत्येक महिलेसाठी प्रेरणादायी आहे.

प्रास्ताविक ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. डॉ. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सोनल चव्हाण यांनी गौरवपत्राचे वाचन केले. पौर्णिमा मंडलिक यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक पवर्ते-पाटील, डॉ. एस. एन. पवार, डॉ. प्रकाश हिलगे, सचिव डॉ. प्राजक्त पाटील, डॉ. रविंद्र कोल्हे, आदी उपस्थित होते.

तरुण भारत
रविवार १९ जानेवारी २०२५

# 'एआय'मुळे सर्वच क्षेत्रात क्रांती घडणार

## ज्येष्ठ वक्ते अच्युत गोडबोले : नवतंत्रज्ञान आत्मसात करणाऱ्यांसाठी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स फायदेशीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

आर्टिफिशिअल इंटेलिजन्समुळे (एआय) पुढील ५ ते १० वर्षांमध्ये जगभर सर्वच क्षेत्रात क्रांती होणार आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रातील नोकऱ्या काही प्रमाणात कमी होतील. हे वास्तव असले तरी ज्यांना नाविन्यपूर्ण गोष्टी शिकण्याची आवड आहे. बदलत्या तंत्रज्ञानाला आत्मसात करून रोजगाराच्या नवनवीन वाटा शोधण्याचे कौशल्य ज्यांच्याकडे आहे, त्यांना काळजी करण्याचे कारण नाही. कॉम्प्युटरप्रमाणे एआयही जीवनातील महत्त्वपूर्ण भाग व्यापून टाकेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ वक्ते अच्युत गोडबोले यांनी केले.



कोल्हापूर : रोटरी मिडटाऊनतर्फे आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना अच्युत गोडबोले. सोबत उपस्थित अन्य मान्यवर.

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाऊनच्यावतीने विवेकानंद कॉलेजमध्ये झालेल्या व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. रोटरी मिडटाऊनच्या अध्यक्षा अरूंधती महाडिक यांच्या संकल्पनेतून व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी गोडबोले म्हणाले, आपण मशीनला जो डाटा पुरवतो, त्याच डाटाचा वापर करून, मशीन आपल्याला आवश्यक ती माहिती पुरवते. लहान मुलांमध्ये कोणत्याही प्रकारचा डाटा नसतो, मात्र आपल्या भोवती असलेली माणसे जे बोलतात त्याचे अवलोकन करून, ते बोलायला शिकते. याच सुत्रानुसार एआय तंत्रज्ञानाचा पाया रचला गेला आहे. सध्या जगभरातील डाटा संकलीत करण्याचे काम सुरू आहे. येत्या पाच वर्षात सर्वच क्षेत्रामध्ये एआय तंत्रज्ञानामुळे क्रांती झाली असेल. त्यामुळे जगभरातील बँका, शाळा, कॉलेज, रिअल इस्टेट व्यवसाय, पत्रकारिता, रिटेल आणि होलसेल मार्केटींगसह शेती क्षेत्रामध्येही अमुलाग्र बदल होईल.

शेतकरी एआयद्वारे जमीनीचा कस, क्षेत्रफळ पाहून कोणती खते किती प्रमाणात द्यायची हे एआयकडून मार्गदर्शन घेईल आणि घरात बसून ड्रोनद्वारे शेती करेल. तंत्रज्ञानाच्या दोन बाजू असतात. त्याप्रमाणे एआय तंत्रज्ञानालाही चांगली आणि वाईट बाजू आहे. त्या दृष्टीनेही जगभर विचार प्रक्रिया सुरू आहे, असेही ते म्हणाले. यावेळी रोटरीचे सचिव बी. एस. शिंपुकडे, रमेश खटावकर, निवृत्त न्यायमूर्ती ए. व्ही. देशपांडे, प्राचार्य आर. आर. कुंभार, अशोक पाटील आदी उपस्थित होते.